अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १७/०२/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०८/२०२५ |
| कलम | कलम ७(अ), १२ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) विशाल रामचंद्र पाण्डेय, सर्वेक्षक (खाजगी इसम)<br>२) ऋषिकेश रामदास चव्हाण, पर्यवेक्षक (खाजगी इसम)<br>३) अभिजीत अशोक नागले, पर्यवेक्षक (खाजगी इसम)<br>सर्व कार्यरत :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे(पुर्व), मुंबई मार्फतीने- टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. |
| पाहिजे आरोपी | ४) उमेश (संपुर्ण नाव माहित नाही), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे(पु),मुंबई मार्फतीने- टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. |
| लाचेची मागणी | रू. ३०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. २५,०००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार हे राहत असलेली खोली ही त्यांचे आजीचे नावे आहे. तक्रारदार राहत असलेल्या परिसरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून सन २०१९ मध्ये रोड कटिंगसाठी सर्व्हे करण्यात आला होता. सदर सर्व्हे मध्ये तक्रारदार यांचे खोलीचे सर्व्हे झाले नसल्याने सर्व्हे होवून बायोमेट्रिक करण्यात यावे असा विनंती अर्ज तक्रारदार यांनी मा. सक्षम प्राधिकरी-३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे पुर्व, मुंबई यांचे कार्यालयात केला होता. अर्जासंदर्भात माहिती घेण्याकरीता तक्रारदार यांनी नमूद कार्यालयातील परि. भुमापक अधिकारी श्री. विनोद म्हात्रे यांची भेट घेतली असता, त्यांनी अभिजीत नावाच्या कर्मचाऱ्यास तक्रारदार यांचे खोलीची पाहणी करणेबाबत सुचना केली होती. त्यानुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये तक्रारदार यांचे खोलीचे अभिजीत यांनी पाहणी केली व सांगितले की, वरिष्ठांशी बोलून सदर खोलीचे सर्वेक्षण करायचे की नाही याबाबत निर्णय घेवून कळवितो. त्यानंतर दिनांक २७/०१/२०२५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून पुन्हा सर्वेक्षण होणार असलेबाबतची नोटीस जारी करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १०/०२/२०२५ रोजी अभिजीत, उमेश व म्हात्रे हे तक्रारदार यांचे खोलीची पाहणी करण्यात आले व त्यांनी सांगितले की, सदरहू खोली मॅपमध्ये बसत नसून सर्वेक्षणाच्या शेवटच्या दिवशी काय करायचे ते बघू. दिनांक ११/०२/२०२५ रोजी तक्रारदार यांनी अभिजीत व उमेश यांची भेट घेतली असता, त्यांनी नमूद खोलीचे सर्वेक्षण करण्याकरीता रू. १,००,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी त्यांची ऐवढी एपत नसल्याचे सांगितल्याने त्यांनी रू. २०,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १२/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १३/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान कर्मचारी श्री. उमेश यांनी तक्रारदार यांना ''अॅरेंजमेन्ट झाली का? असे विचारून कर्मचारी श्री. अभिजीत यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी श्री. अभिजीत यांना संपर्क केला असता, त्यांनी तक्रारदार यांना दिनांक १४/०२/२०२५ रोजी भेटण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक १४/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान कर्मचारी ऋषिकेश चव्हाण व अभिजीत नागले यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे आजीचे खोलीचे सर्वेक्षण करण्याकरीता रू. ३०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. २५,०००/- इतकी लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान विशाल पांण्डेय यांना रू. २५,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले व सोबत असणारे ऋषिकेश चव्हाण व अभिजीत नागले यांना ताब्यात घेण्यात आले. म्हणून उपरोक्त नमूद खाजगी इसम यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. चंद्रकांत माळी, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर कुठल्याही लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क :- लाचलुचपत **प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट:– acbmaharashtra.gov.in, ईमेल:– acbwebmail@mahapolice.gov.in मोबाईल ॲप:– www.acbmaharashtra.net
ईमेल:– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in फेसबुक :– www.facebook.com - Maharashtra ACB